# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025






प्रकाशनप्रसंगी संजीव चव्हाण, डॉ. एस. डी. पवार, डॉ. विनायक राऊत, डॉ. सौ. एच. व्ही. काटे, प्रा. दीपक दाभाडे व इतर.

# 'कोयनातीर' नियतकालिक विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीचे व्यासपीठ : संजीव चव्हाण

**पाटण, दि. ७ :** विद्यार्थ्यांनी चांगले वाचन केले तर ते चांगले लिहू शकतात. कोयनातीर नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व त्यांच्यातील सृजनशील लेखनाला वाव देण्यासाठीचे व्यासपीठ आहे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात 'कोयनातीर' या नियतकालिकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी कोयनातीर नियतकालिकाचे मुख्य संपादक प्रा. डॉ. विनायक राऊत, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. सौ. एच. व्ही. काटे, जुनिअर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मुख्य संपादक डॉ. विनायक राऊत यांनी प्रास्ताविकात कोयनातीर या अंकाची माहिती दिली. तद्नंतर या नियतकालिकेचे संचालक संजीवन चव्हाण व उपस्थितांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

संजीव चव्हाण यांनी अंकामधील विविध लेखाबद्दल चर्चा केली. विद्यार्थ्यांनी लिहिले पाहिजे. आपले अनुभव कथन केले पाहिजेत. सध्याचा विद्यार्थी हा मोबाइलमध्ये गुरफटला आहे, त्याने योग्य अशा कारणांसाठी मोबाइल वापरून बाकीचा वेळ अभ्यास, वाचन तसेच आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी देणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस.डी. पवार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवित असते. त्यामधील एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे कोयनातीर हे नियतकालिक होय. कॉलेजच्यावतीने दरवर्षी नियतकालिक प्रकाशित केले जाते. यामध्ये विद्यार्थी लेखांच्या विविध कलागुणांच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असतो. दरवर्षी आपल्या कॉलेजच्या अंकाला अनेक पारितोषिके मिळतात. या वर्षी सुद्धा आपण स्पर्धेत कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांनी आभार मानले. डॉ. श्रीनिवास पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास सर्व विभागीय संपादक, सर्व प्राध्यापक तसेच प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

दैनिक – ए
दिनांक – 8
वार – स
पान नं –